-: प्रेसनोट :-                                दिनांक : १२/०३/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १४/२०२१ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **संदीप ज्ञानदेव पन्हाळकर वय ३९ वर्षे**<br>धंदा - कामगार ( नेमणुक - सहा. अभियंता (जलकामे) अे - विभाग, जलमापक विभाग व जलदेयके विभाग, ६ वा मजला बुहन्मुंबई महानगरपालिका, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ ) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु.३५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रू.३५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे मेकर आर्केड शॉपिंग सेंटर, कफ परेड, मुंबई ०५ येथे सोसायटी मॅनेजर म्हणुन काम करीत आहेत. दि. ०९/०३/२०२१ रोजी तक्रारदार हे सोसायटीच्या ऑफीस मध्ये असताना सहा. अभियंता (जलकामे) अे - विभाग, जलमापक विभाग व जलदेयके विभाग, ६ वा मजला बुहन्मुंबई महानगरपालिका, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई या कार्यालयातील आरोपी लोकसेवक हे तक्रारदार यांना भेटून मेकर आर्केड शॉपिंग सेंटरमधील एका दुकानाचा वॉटर रीडींग मीटर बऱ्याच दिवसापासुन नादुरूस्त असल्यामुळे संबंधित दुकानदाराला पाण्याच्या बिलाची नोटीस काढुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे सांगितले. तसेच दंडाची रक्कम सुमारे रू. २,००,०००/- एवढी होईल असे सांगुन बिलाची नोटीस व दंडात्मक कारवाई न करण्याकरीता रू. १,००,०००/- रक्कम दयावी लागेल असे सांगितले. आलोसे यास लाच देण्याची फिर्यादी यांची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १०/०३/२०२१ रोजी लाप्रवि, मुंबई कार्यालयात लेखी तक्रार दिली.<br><br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १२/०३/२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान नोटीस बजावणी व दंडात्मक कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती लोकसेवक यांनी रू. ३५,०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर लावण्यात आलेल्या सापळा कारवाईच्या वेळी लोकसेवक संदीप पन्हाळकर यांना तक्रारदार यांच्याकडून रूपये ३५,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडल्याने त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भष्ट्राचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०.
संकेतस्थळ — **acbmaharashtra.gov.in**
ईमेल :— **1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन – **www.acbmaharashtra.net**
टोलफ्री क्र. १०६४
दूरध्वनी क्र.०२२-२४९२१२१२,
फॅक्स क्र.०२२-२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक-९९३०९९७७००

Sd/- 12/3/2021
( वैशाली गोरडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई